# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.02.2025** **वार- बुधवार**

---

**सावरकर**

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या वास्तव्यानं पावन झालेली, ऐतिहासिक आणि विद्यार्थ्यांचं स्फूर्तीस्थान असलेली वसतिगृहातील खोली आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त नागरिकांसाठी खुली ठेवण्यात आली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे फर्ग्युसन महाविद्यालयाचे विद्यार्थी असताना सन 1902 ते 1905 या कालावधीमध्ये या खोलीमध्ये राहात होते. त्यांना मिळालेल्या डी.लिट.पदवीचे दोन गणवेशदेखील याठिकाणी ठेवण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष प्रमोद रावत यांच्या हस्ते सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपाध्यक्ष ॲड. अशोक पलांडे, कार्यवाह डॉ. आनंद काटिकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**जीबीएस**

पिंपरी शहरात आतापर्यंत 32 जणांना जीबीएस अर्थात गुईलेन बॅरे सिंड्रोम या आजाराची लागण झाली असून, त्यापैकी 26 रुग्ण उपचारानंतर बरे झाले आहेत. एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे, तर तीन रुग्ण जीवनरक्षक प्रणालीवर आहेत. उर्वरित रुग्णांची प्रकृती स्थिर आहे. शहरात आढळलेल्या जीबीएस रुग्णांमध्ये सर्वाधिक संख्या तरुणांची आहे. सर्वांत कमी संख्या सत्तरी पार केलेल्या वृद्ध नागरिकांची आहे. 9 वर्षे वयापर्यंतच्या तीन मुलांना जीबीएसची लागण झाली आहे. अचानक उद्भवलेला चालण्यातील त्रास किंवा अशक्तपणा, अधिक दिवस अतिसार, अन्न गिळताना त्रास होणं, हाता-पायांना मुंग्या येणं ही या आजाराची लक्षणं असल्याचं आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे यांनी सांगितलं.

**कचरा**

पिंपरी चिंचवड शहर कचरामुक्त करण्यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागानं विविध उपक्रम सुरू केले आहेत. सार्वजनिक परिसर स्वच्छ करून कचऱ्यातील टाकाऊ वस्तूंचा वापर करुन तिथं ‘सेल्फी पॉईंट’ केले जात आहेत. आरोग्य आणि पर्यावरण विषयक जनजागृती करणारे सामाजिक संदेश लिहिण्यात आले आहेत. यापूर्वी पिंपळे गुरव इथं 'कचऱ्यातून कला' संकल्पना राबवण्यात आली.

**भीमाशंकर**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या पुणे जिल्ह्यातील श्री क्षेत्र भीमाशंकर इथं महाशिवरात्रीनिमित्त लाखो भाविकांनी हजेरी लावली. मंदिराचा गाभारा आणि परिसर रंगबिरंगी फुलांनी सजविण्यात आला होता, विद्युत रोषणाईनं मंदिर उजळून निघालं होतं. शासकीय महापूजेस माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, आदि मान्यवर उपस्थित होते. पूजेनंतर वेदपठण करून प्रत्यक्ष यात्रेला सुरुवात झाली.

**जेजुरी**

महाशिवरात्रीनिमित्त जेजुरीच्या खंडोबा गडावरील शिवलिंग आज पहाटे भाविकांना देवदर्शनासाठी खुलं करण्यात आलं. भाविकांनी भंडारा खोबऱ्याची उधळण आणि सदानंदाचा जयघोष करीत दर्शन घेतलं. मध्यरात्री 12 च्या सुमारास मुख्य मंदिराच्या मुख्य कळसातील शिवलिंग आणि भूगर्भातील शिवलिंग दर्शनासाठी खुलं केलं जातं.

**जागा**

मुळा-मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी आवश्यक असणारी संगमवाडी इथली संरक्षण दलाची जागा पुणे महापालिकेला हस्तांतरित करण्यात आली आहे. या संदर्भात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेऊन पाठपुरावा केला होता. मुळा-मुठा नद्यांची शहरातील एकंदर लांबी 44 किलोमीटरहून अधिक आहे. नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाची 11 भागांमध्ये विभागणी करण्यात आली असून यापैकी संगमवाडी ते बंडगार्डन पूल या भागासाठी संरक्षण विभागाची 17 एकर जागा मिळण्याचा प्रस्ताव होता.

**बँक**

केंद्र सरकारच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांना व्हावा यासाठी बँक ऑफ इंडियानं महत्वाची भूमिका बजावली असल्याचं बँकेचे कार्यकारी संचालक श्री एम कार्तिकेयन यांनी नुकतंच सांगितलं. पुणे विभागाच्या दौऱ्यावर आले असताना कार्तिकेयन यांनी बँकेच्या गणेशखिंड रस्त्यावरील विभागीय कार्यालयाला भेट दिल्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

**भरती**

संरक्षण मंत्रालयाच्या पुनर्वसन महासंचालनालयाद्वारे माजी सैनिकांसाठी पुण्यातील विमाननगर गेट इथल्या वायुदल स्थानकावर भरती मेळावा परवा 28 तारखेला आयोजित करण्यात येणार आहे. माजी सैनिकांना रोजगाराची दुसरी संधी मिळण्याच्या उद्देशानं आयोजित या मेळाव्यात सकाळी सात ते दहा वाजेपर्यंत इथं नोंदणी करता येईल.

**कुस्ती**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीनं आयोजित वरिष्ठ ग्रीको रोमन राज्यस्तरीय अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत वाइल्ड कार्डद्वारे प्रवेश देण्यात आलेल्या चंद्रपूरच्या शिवरामदादा तालीमचा मल्ल शुभम सिदनाळेनं स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. या स्पर्धा लोणीकंद इथं पार पडल्या. महाराष्ट्र केसरी किताबी लढतीमध्ये 130 किलो वजनी गटात चंद्रपूरच्या शुभम सिदनाळे यानं कोल्हापूरचा राष्ट्रीय पदक विजेता रोहन उंडे याच्यावर मात केली. या स्पर्धेत 6 महानगरपालिका आणि 36 जिल्हे असे एकंदर 42 जिल्हा कुस्तीगीर संघ सहभागी झाले होते

**बोलक्या भिंती**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड इथल्या मरहूम फकीरभाई पानसरे उर्दू प्राथमिक शाळेमध्ये आकांक्षा फाऊंडेशन आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या 15 सदस्यांच्या सहकार्यानं प्रायोगिक तत्वावर बोलक्या भिंती हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वतः चित्र काढून शाळेच्या भिंती रंगविल्या आहेत. त्यामध्ये निसर्गचित्रं, ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वं आणि प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांनी भिंतींवर रेखाटली आहेत. याशिवाय शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांना रंगसंगती, रेखाटन आणि भिंतींवर चित्रं काढण्याच्या तंत्राचं प्रशिक्षण देखील देत आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 35 अंश तर किमान 15 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**